# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक – १९ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे राज्याची वाटचाल वेगवान करण्यासाठी दावोस परिषद निर्णायक–मुख्यमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- राज्यातल्या सर्व मनपा महापौर पदांची येत्या गुरुवारी मंत्रालयात आरक्षण सोडत
- जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीत भाजपसोबत युतीचा शिवसेनेचा कल

आणि

- नांदेड इथं नियोजित हिंद की चादर सोहळ्याच्या आमंत्रणाचा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून स्वीकार

****

राज्याची एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल वेगवान करण्यासाठी दावोस परिषद निर्णायक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. आज दावोस इथं नियोजित परिषदेत सहभागी होण्यापूर्वी मुख्यमंत्री बोलत होते. या परिषदेत गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले असून, यंदा त्याहून अधिक गुंतवणूक आणण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या ५६व्या वार्षिक बैठकीला जगभरातून तीन हजारहून अधिक नेते उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, प्रल्हाद जोशी आणि के. राममोहन नायडू यांच्यासह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि झारखंडचे मुख्यमंत्री विविध देशांच्या गुंतवणूकदारांसमोर आपापल्या राज्यांचे सादरीकरण करतील.

****

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी–आयएमएफने २०२५ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज शून्य पूर्णांक ७ दशांश अंकांनी वाढवून ७ पूर्णांक ३ टक्के केला आहे. ही वाढ या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीतील सशक्त गतीचं प्रतीक असल्याचं आयएमएफने म्हटलं आहे. आगामी आर्थिक वर्षासाठी भारताचा आर्थिक विकास दर ६ पूर्णांक ४ टक्के राहण्याचा अंदाजही आयएमएफने वर्तवला आहे.

****

२०३० पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न चार हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलं आहे. २०२५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने चार ट्रिलियन डॉलरचा टप्पा गाठला. पुढल्या दोन वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरचं लक्ष्य गाठेल असं एसबीआयच्या या अहवालात म्हटलं आहे.

****

विकसित भारत जी राम जी योजनेबाबत काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याची टीका केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यापूर्वीच्या मनरेगा योजनेतून काँग्रेसने दिलेले हक्क केवळ कागदावर राहिले आपल्या सरकारने गरजूंना एकशे २५ दिवस रोजगाराचा हक्क दिल्याचं चौहान यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान**

****

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल – एनडीआरएफचा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त या दलाच्या व्यावसायिकता, समर्पण आणि आपत्ती प्रतिसादातील धाडसाचं कौतुक केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील एनडीआरएफला शुभेच्छा दिल्या आहेत. आपत्तीदरम्यान एनडीआरएफ हा देशाचा आधारस्तंभ असून, आपत्ती–प्रतिरोधक राष्ट्र निर्माण करण्याच्या सरकारच्या संकल्पाला साकार करण्यात हा प्रतिसाद दल महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदासाठी पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज अर्ज दाखल केला. दिल्लीत पक्ष मुख्यालयात भाजपच्या निवडणूक

अधिकाऱ्यांकडे त्यांनी अर्ज दाखल केला. पक्षाचे अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांची आरक्षण सोडत येत्या गुरुवारी मंत्रालयात काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया राबवली जाईल. महापौर पदासाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर विविध महानगरपालिकामधे महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल आणि सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग येईल.

**

मुंबईत महायुतीचाच महापौर होणार असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे.ते आज मुंबईत बोलत होते. कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यासह महायुती म्हणून जिथे जिथे एकत्र निवडणूक लढलो, त्याठिकाणी महायुतीचाच महापौर बनवण्यात येईल असंही शिंदे यांनी सांगितलं. नागरिकांनी याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असं शिंदे यावेळी म्हणाले.

**

उल्हासनगर महानगरपालिकेत वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या दोन नवनिर्वाचित नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. उल्हासनगरमधे भाजपानं ३७ आणि शिवसेनेनं ३६ जागा जिंकल्या आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाचे विकास खरात आणि सुरेखा सोनावणे यांनी आपण शिवसेनेला पाठिंबा देत असल्याचं पत्र काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केलं.

**

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपसोबत युतीसाठी आग्रही असल्याची सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षातील नेत्यांना दिली आहे. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी ही माहिती दिली. शिंदे यांनी मुंबईत घेतलेल्या बैठकीला पालकमंत्री शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ उपस्थित होते. यावेळी महापालिका निवडणुकीत पक्षाच्या असमाधानकारक कामगिरीबाबत शिंदे यांनी नाराजी व्यक्त केल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

****

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य सत्संग वर्षानिमित्त नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारीला होणाऱ्या "हिंद दी चादर" या सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना आमंत्रण देण्यात आलं आहे. राज्यस्तरीय सत्संग समिती सदस्यांनी आज नवी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना या कार्यक्रमाचं आमंत्रण दिलं. २५ तारखेला होणाऱ्या सोहळ्यास उपस्थित राहण्याचं आमंत्रण शहा यांनी स्वीकारल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी आपल्या प्रचारासाठी झालेल्या एकूण खर्चाचा तपशील ३० दिवसांच्या आत निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्यास संबंधित सदस्याची सदस्यता रद्द होऊ शकते, असा इशारा मनपा आयुक्तांनी दिला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात डिजिटल युगातील कोशीय लिखाण : संकल्पना तंत्र आणि स्वामित्व हक्क या विषयावरील कार्यशाळेला आजपासून प्रारंभ झाला. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते या कार्यशाळेचं उद्घाटन झालं. विद्यापीठ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलेन्स इन इंजिनियरिंग ॲंड मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेचा उद्या समारोप होणार आहे.

****

कॉपीमुक्त अभियान राबवणं हे फक्त परीक्षा पद्धती सुधारणा नसून भविष्यातील नीतीमान नागरिक घडवण्याचं अभियान असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या अनुषंगाने कॉपीमुक्त अभियान राबविण्यासंदर्भात मुख्याध्यापक, शिक्षकांची सभा आज शहरात झाली त्यावेळी ते बोलत होते. अभियान यशस्वी करणे ही सर्व संबंधित विभागांची सामुहिक जबाबदारी असून या अपप्रवृत्ती विद्यार्थ्यापासून दूर ठेवण्यावर भर देण्याचं आवाहन स्वामी यांनी यावेळी केलं

****

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील कृषि विमान संघाने दिल्लीत ग्रेटर नोएडा इथल्या गौतम बुद्ध विद्यापीठ, झालेल्या 'निडर २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत 'प्रिसीजन ॲग्रीकल्चर' या विभागात प्रथम क्रमांक पटकावला. या संघाला दिड लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आलं.

****

दिल्ली आणि लडाखमधील लेह परिसरात आज सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. दिल्लीतील धक्का सौम्य होता, तर लेहमध्ये भूकंप मापकावर त्याची तीव्रता ५ पूर्णांक ७ इतकी नोंदली गेली. सुदैवाने या भूकंपामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी किंवा मालमत्तेचं नुकसान झालं नाही.

****

राज्यात आज सर्वात कमी अकरा पूर्णांक दोन दशांश सेल्सियस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल नाशिक इथं अकरा पूर्णांक चार तर जळगाव इथं अकरा पूर्णांक आठ दशांश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यातल्या तापमानात वाढ झाली आहे. बीड इथं किमान तापमान १५ अंश, तर परभणी तसंच छत्रपती संभाजीनगर इथं साडे सोळा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****